# Matrumandir-Devrukh

# Dedicated
# Covid Health center (DCHC)

Special

# Bulletin

20 days of Covid Care

संपर्क : - SMS हॉस्पिटल
7798241390 / 02354260026

# मातृमंदिरला कोविडसाठी, अद्ययावत सामुग्रीची भेट...

मातृमंदिर रुग्णालयाने देवरुख येथे कोविड केअर सेंटर सुरु करतांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून मातृमंदिरचे हितचिंतक आणि सभासद यांना या उपक्रमासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला मुंबई- पुणे संपुर्ण महाराष्ट्र आणि परदेशातून अभूतपुर्व असा प्रतिसाद लाभला. या माध्यमातून मातृमंदिरच्या या खेडेगावातील रुग्णालयात 30 ऑक्सीजन बेडची सुविधा आणि प्रथमच आयसीयू सुविधा उपलब्ध केली. मातृमंदिरच्या या डेडीकेटेड कोविड केंद्रासाठी महाराष्ट्रातील अनेकांकडून ऑक्सीजन कॉन्सेन्ट्रेटर, बायपॅप तसेच आयसीयू अद्ययावत बेड आणि अन्य कोविड सेंटरसाठी अद्ययावत सामुग्री देणगी स्वरुपात मिळाली असून ती हॉस्पिटल प्रमुख डॉ. परमेश्वर गोंड यांच्या कडे संस्था अध्यक्ष अभिजित हेगशेट्ये आणि कार्यवाह आत्माराम मेस्त्री यांच्या हस्ते आज देण्यात आली. संपुर्ण रत्नागिरी जिल्ह्यात मातृमंदिर कोविड सेंटर असे एकमेव संस्थात्मक सेंटर आहे. जे देवरुख सारख्या सह्याद्रिच्या खोऱ्यातील दुर्गम भागात कोविड डेडीकेटेड सेंटर उभारत अद्ययावत सवलत, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोफत जेवण आणि गरीबांना आर्थिक सवलतीत औषधोपचार उपलब्ध करुन देत आहे.

मातृमंदिरच्या डेडीकेटेड कोविड सेंटरचे पुर्ण आरोग्य व्यवस्थापन डॉ. परमेश्वर गोंड यांच्या एसएमएस हॉस्पिटल मार्फत चालते. डॉ. पाटील, डॉ. शिंदे पाटील, डॉ. कासार ... आणि भूलतज्ञ डॉ.ठोंबरे सोबत तज्ञ नर्स आणि सारी टीम अविरतपणे काम करत आहेत. याचा परिणाम रुग्णांना अत्यंत उत्तम औषधोपचार, सुविधा आणि मानसिक समुपदेशन सुविधा प्राप्त होत आहेत. उत्तम डायग्नोसीस यामुळे येथील रुग्णांच्या रिकव्हरीचे प्रमाण 90 टक्के आहे. आजपर्यंत 60-65 रुग्ण गेल्या 15 दिवसात बरे होऊन बाहेर पडले आहेत.

देवरुख परिसरातील मार्च एप्रिल महिन्यातील रुग्णवाढीचा बेफाम वेग आणि त्यांना नमिळू शकणारी आरोग्य सुविधा त्या अभावी काही रुग्णांना आलेले मृत्यू . हे पाहतांच मातृमंदिर हॉस्पिटलने एमएमएस हॉस्पिटलच्या सहाय्याने तात्काळ कोविड केअर सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला. डॉ. परमेश्वर यांचा या क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव आणि एकुणच नव्या तंत्रज्ञानाची जोड याचा अभूतपुर्व जोडणी करत त्यांनी या हॉस्पिटलला काही दिवसातच डेडीकेटेड कोविड सेंटरमध्ये रुपांतरीत केले.

इटेन्सीव्ह केअर यूनिट सुविधा ही तर देवरुखातील पहिली 10 बेडची आयसीयू सुविधा उपलब्ध झाली आहे. गेल्या 20-25 वर्षाचे या परिसराची ती मागणी होती. या सुविधे अभावी येथील अनेक मान्यवरांना कोल्हापूर - रत्नागिरी येथे रुग्णालयात पोहोचण्यापुर्वाच प्राण गमवावे लागल्याची देवरुख वासीयांची वर्षानुवर्षाची खंत होती ती या माध्यमातून पुर्ण झाल्याचे समाधान यावेळी कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले मातृमंदिर कोविड केंद्र सुरु करतांना ते अत्यंत कमी यंत्रणेच्या उपलब्धतेत कसे चालवावे हा प्रश्न होता. मात्र मातृमंदिर संचालक मंडळाने अत्यंत धाडसी निर्णय घेत हे कोविड केअर सेंटर सुरु केले आणि मातृमंदिरच्या सभासद आणि हितचिंतकांना मदतीची साद घातली. मातृमंदिरच्या परिवार महाराष्ट्रात आणि देशात देशाबाहेर प्रचंड विस्तारीत आहे. इंदिराबाई हळबे यांनी 1954 सालीफक्त मातृमंदिर या हॉस्पिटलची दोन कॉटच्या साहाय्याने स्थापना केली नाही तर त्यांनी एका नव्या सामाजिक चळवळीला जन्म दिला. या सामाजिक चळवळीत त्यांनी अनेकांना जोडून घेतले. मातृमंदिर व्यक्तीकेंद्रित आणि संचकुचीत नठेवता मातृमंदिर नावाची सामाजिक चळवळ अधिकाधीक लोकांसोबत, समुहा सोबत जोडून घेतली.

मावशींच्या या अभूतपूर्व योगदानीची भविष्याचा वेध घेणाऱ्या धोरणाची विचारांची प्रचिती लोकांची मनात श्रध्दारुपात होती आम्ही फक्त त्याला साद घातली आणि या संचीताचे रुपांतर अभूतपुर्व प्रतिसादात झाले. आम्ही फक्त निमित्त मात्र ही सारी पुण्याईच त्या माऊलीची सावलीसारखी मातृमंदिरच्या प्रत्येक क्षणाला कार्यरत होणारी.

मातृमंदिरच्या या आवाहनाला उत्कट आणि उत्फुल्ल प्रतिसाद लाभला जो आम्हा साऱ्या संचालक आणि कार्यकारी मंडळाचा उत्साह वाढविणारा होता. त्यामुळे कोविडच्या समस्येवर मात करत आमचा कर्मचारीही या कार्यात आपले योगदान समर्पित करत राहीला.

या सहयोग प्रक्रियेतील पहिला मान मी आमचे मार्गदर्शक मित्र डॉ. आशिष देशपांडे यांच्या फोनला देईन. त्यांनी फोन करुन मला काही निवडक महत्वाच्या टीपस् दिल्या, छानसे निवेदन मराठी इंग्रजीत करण्याचे मार्गदर्शन केले. आणि कोविड सेंटर सुरु करण्याच्या आमच्या निर्णयाला ठाम पाठींबा दिला. ते खुपच महत्वाचे होते. सोबत स्वतःचे तात्काळ 10,000/-चा निधी आणि त्या पाठोपाठ श्री. कुळकर्णी यांचा 2 लाखाचा निधी हा अत्यंत विस्मयजनक उत्साह वाढविणारा होता. त्याचवेळी अपना बँकेचे अध्यक्ष दत्ताराम चाळके यांनी अडीच लाखाचे दोन ऑक्सीजन कॉन्सेट्रेटर पाठविण्याची केलेली व्यवस्था, मातृमंदिरचे माजी उपाध्यक्ष अशोकदादा वायकुळ यांचा उत्साह तर विलक्षण चैतन्यमय त्यांनी स्नेह ग्रुपच्या माध्यमातून 100 पेक्षा अधिक सहकाऱ्यांना या कार्यात सहभागी करत 3लाखापेक्षा अधिक निधी जमवून दिला. त्याच बरोबर गीता ताई, शरद कदम यांनी आपल्या सहकारी ग्रुप माध्यमातून निधी दिला.

सध्या 30 बेड ऑक्सीजन सुविधे सह सज्ज आहेत. या मतदारसंघातील आमदार शेखर निकम यांनी मोठे आर्थिक सहकार्य केले तसेच त्यांच्या माध्यमातून आलेले डॉ. इरफान चिकटे यांच्या संस्थेमार्फत मातृमंदिरला स्वतंत्र ऑक्सीजन प्लँट उभारणार आहेत. सध्य परिस्थितीत कोविड कीती वाढणार याचा अंदाज नाही मात्र पुढील तिसरी लाट ही लहान मुलांच्या सहभागाची असेल असा धोका व्यक्त होत आहे याचा विचार करुन मातृमंदिर हॉस्पिटल स्वतंत्र 10-20 बेडचा लहानमुलांचा विभाग ही सुरु करण्याचे नियोजन करत आहे. देवरुख परिसरातील 100 गावांना उत्तम आरोग्य सुविधा देणे हे मातृमंदिरचे ध्येय असून कोविड काळात मातृमंदिरने या सुविधा अधिक व्यापक केल्या आहेत. या उपक्रमासाठी मातृमंदिरला हजारो हातांचे सहकार्य लाभत आहे त्याचे मातृमंदिर सदैव रुणी असल्याचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी सांगीतले.

आपल्या सर्वांच्या मदतीने आणि डॉक्टरांच्या प्रयत्नांनी

आपले कोविड केअर संेटर आता
कोविड रुग्णांच्या सेवेसाठी

## एक पाऊल पुढे...

आपल्या सुसज्ज ICU सह

आपल हॉस्पिटल आता झालं आहे

# डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर
# DCHC

**MATRUMANDIR DCHC**

# करोनाविरोधी लढाईचे २० दिवस....

**डॉ.प्रकाश पाटील**

जगभरात आलेल्या कोविडच्या दुसऱ्या लाटेची तीव्रता वाढली आणि आपल्या देवरुख-संगमेश्वर भागातील पेशंटच्या संख्येतही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. पण जेव्हा सरकारी यंत्रणाही अपुरी पडताना दिसायला लागली तेव्हा ग्रामीण भागातील रुग्णांची उपचारांसाठी होणारी फरपट पाहून 'मातृमंदिर' संस्थेचे पदाधिकारी व आम्ही एकत्र बसून यावर त्वरित मदत करण्यासाठी 'कोविड केअर सेंटर' सुरु करण्याचा निर्णय घेतला.

सुरवात झाल्यानंतर बेड, ऑक्सिजन आणि इतर चौकशीसाठी अक्षरशः २४ तास फोन वाजायला लागले आणि मग खऱ्या अर्थाने आपल्या भागातील गरज लक्षात यायला लागली. कोविड केअर सेंटर सुरु करताना हॉस्पिटल मध्ये लागणारे सर्व स्किल्ड हेल्पिंग हँड्स मिळण्यासाठीपण खूप अडचण आली. विशेषतः ICU स्टाफ हा उत्तम प्रशिक्षित असावा लागतो. अशा प्रसंगी मग आमच्याकडे असलेला ICU स्टाफ पूर्णवेळ तिथेच ठेवून इतर स्टाफच्याही ड्युटी अशा प्लॅन केल्या कि एकाचवेळी त्यांचेही प्रशिक्षण होईल.  सोबतच यासाठी खास अशा लागणाऱ्या सर्व सोयी-सुविधा यांची तयारी करतानाच देवरुखसारख्या ठिकाणी कोविड पेशंटला उपचार होवू शकतात का यावरही लोकांमध्ये साशंकता होती. पण आमच्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी तालुक्यातील सर्व भागांतून अगदी 20-21 चा स्कोर असलेले पेशंटही अगदी विश्वासाने आणले जावू लागले.

या दरम्यानच्या काळात विशेषतः वादळ झाल्यानंतर लाईट जाण्याचे प्रमाण वाढले. अशा वेळी लाईट गेल्यावर जेनेरेटर सुरु करण्याची मधली वेळ क्रिटीकल पेशंटसाठी फार महत्वाची असते. परंतु आमच्या स्टाफने याची इतकी काळजी घेतली पेशंटला जराही त्रास झाला नाही.

कोवीडकाळात सोशल मेडियाद्वारे होणारे चांगले-वाईट प्रशिक्षण यामुळेही पेशंटच्या नातेवाईकांना हाताळताना अडचणी आल्या. कोरोनाविषयी समाजामध्ये पसरलेले अनेक गैरसमज, भीती यामुळे आलेला पेशंट स्टेबल व्हायला वेळ घेत होता परंतु 1-2 दिवसानंतर खरी परिस्थिती हि ऐकीव गोष्टींपेक्षा वेगळी आहे हे लक्षात आल्यावर मात्र पेशंट खुश असे. अगदी रेमडेसीवीर इंजेक्शनबाबत सुरुवातीला लोकच मागणी करत होते आणि आता मात्र इंजेक्शन नको म्हणायला लागले.

याच काळात रुग्णांच्यादेखील अनेक तऱ्हा पाहायला मिळाल्या. ग्रामीण भागातील रुग्ण, ज्यांना हॉस्पिटल मध्ये राहण्याची सवयच नाही अशांना सलग ७-१० दिवस इथे राहणे खूपच त्रासदायक वाटत होते. वयस्कर लोकं तर उपचारादरम्यान  अगदी असहकार पुकारत होते. इंजेक्शनला नकार, मास्क लावून न घेणे , सूचना अजिबात न ऐकणे आणि एकंदर उपचारांना विरोध करत घरी जाण्यासाठी तगादा लावणे अशा वेळी आमच्याही सहनशीलतेची परीक्षा झाली. काही पेशंटना तर कुटुंबियांची परवानगी घेवून झोपवून ठेवून किंवा बांधून ठेवून उपचार केले. परंतु या केसेस अगदी नेमक्याच, इतरवेळी मात्र आम्ही पेशंटला समजावण्यात यशस्वी झालो.

एक मनोरुग्ण करोना पॉझीटीव होता. त्याला हाताळून योग्य उपचार करतानाही अशीच तारांबळ झाली. वॉर्ड मधून निघून गेटवर जावून बसलेला हा रुग्ण तर सुरुवातीला माझ्याशिवाय इतर कुणाचंही ऐकत न्हवता. पण नंतर आमच्या स्टाफने त्याचाही विश्वास संपादन केला आणि योग्य उपचार केले.

सगळीकडे सुरु असलेला कोरोनाचा ट्रेंड पाहता इथेही तरुण रुग्ण वाढताहेत आणि विशेषतः श्वसनाला काहीही त्रास न होता ऑक्सिजन लेवल कमी होणे, ज्याला आम्ही ‘Silent Hypoxia’ म्हणतो याप्रकारचे तरुण ज्यास्त भरती होवू लागले आहेत.

कोरोना डेडीकेटेट हेल्थ सेंटर सुरु होवून २० दिवस झाले. वैयक्तिक पातळीवर स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेत असतानाच आपल्या ग्रामीण भागातील तातडीची गरज म्हणून सुरु झालेल्या या उपचार केंद्रावर पूर्णवेळ काम करणे हे तसं अवघडच. पण माझे सहकारी डॉक्टर व सर्व स्टाफ यांनी कोणत्याही प्रकारे भीती न बाळगता योग्य ती काटेकोर काळजी घेत जवळपास ६० पेशंट करोनामुक्त केले. माझ्या सर्व स्टाफचा मला विशेष अभिमान वाटतो कारण या आपत्कालीन परीस्तीतीचे गांभीर्य ओळखून कुणीही आजपर्यंत एक दिवसाचीही सुट्टी घेतलेली नाही. स्वतःची दिवस किंवा रात्रपाळी झाल्यावरही अम्ब्युलंस सोबत जाणे वा इतर कामासाठी तय्यार राहतात. यातचसंपूर्ण काळजी घेवूनही आमच्या एकूण ३० स्टाफ पैकी एक स्टाफ मात्र कोरोना पॉझीटिव्ह झाला. परंतु त्यालाही आपण वेळेत योग्य उपचार देवून बरे केले आणि त्यानंतर लगेचच तो ड्युटीवर जॉईनही झाला.

मातृमंदिर संस्थेने या परिसरात १९५४ पासून केलेल्या कामामुळे येणाऱ्या प्रत्येक पेशंटला या हॉस्पिटलबाबत एक वेगळी आपुलकी व विश्वास असलेला मला दिसला. देवरुख सारख्या ठिकाणी आम्ही इतक्या मोठ्या प्रमाणात काम करू शकलो यासाठी मातृमंदिरचा हाच वारसा आणि खंबीर पाठींबा याची मदत झाली. गरीब रुग्णांसाठी बेड आरक्षित केलेले आहेत. पेशंटच्या नातेवाईकांसाठी समुपदेशनाची व्यवस्था करून , आयसीयू बेड, BiPAP सारखी अद्ययावत उपकरणे उपलब्ध केली जात आहेत . रुग्णांसाठी रोजची उत्तम चहा,नास्ता, जेवणाची व्यवस्था तसेच गरजू रुग्णांना आर्थिक मदतही केली जाते आहे.

खरतर या कोविडच्या स्थितीतून आपण सगळे लवकरात लवकर सुखरूप बाहेर पडावे हीच मनापासून इच्छा आहेच परंतु सद्यस्थितीत आमच्यापर्यंत आलेला एक-एक रुग्ण बरा होवून आनंदाने घरी जाईल यासाठी एक डॉक्टर म्हणून मी आणि माझा सर्व स्टाफ कायम प्रयत्नशील राहू.

# MATRUMANDIR DCHC








# निरामय दातृत्व

मातृमंदिर रुग्णालयाने देवरुख येथे कोविड केअर सेंटर सुरु करतांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून मातृमंदिरचे हितचिंतक आणि सभासद यांना या उपक्रमासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला मुंबई- पुणे संपुर्ण महाराष्ट्र आणि परदेशातून अभूतपुर्व असा प्रतिसाद लाभला. या माध्यमातून मातृमंदिरच्या या खेडेगावातील रुग्णालयात 30 ऑक्सीजन बेडची सुविधा आणि प्रथमच आयसीयू सुविधा , मोफत जेवण, औषधोपचार गरीबांना आर्थिक सवलत या सुविधा सुरु करणे संस्थेला शक्य झाले. यात एक असे निरामय देणगीदार संस्थेच्या संपर्कात आले की, त्यांनी पहिली अट घातली, माझे नाव कोठे येता कामा नये. आम्हीही ते मान्य केले आणि हॉस्पिटलच्या गरजांची यादीच पुढे केली.

आपले नाव कोणत्याही परिस्थितीत जाहिर करावयाचे नाही अशी अट घालणारी ही महनीय व्यक्तीने हॉस्पीटलसाठी 3 अद्ययावत आयसीयू बेड आणि 2 बायपॅप (ऑक्सीजन कीट) हे साहित्य स्वतः खरेदी करुन पाठवून दिले.आज दुपारी हे साहित्य घेऊन टेम्पो मातृमंदिरच्या आवारात प्रवेशता झाला. संस्थेचे सीइओ सतिश शिर्के आणि संचालक नाना कोळवणकर यांनी त्याचे स्वागत केले. आणि सामान उतरवून घेतले. दुपारची वेळ असल्याने हे सामान ठेवून घेऊ आणि उद्या रितसर ते हॉस्पिटल विभागाच्या ताब्यात देऊ असा आमचा विचार होता. मात्र टेम्पोतून सामान उतर असतांना डॉ. पाटील आले आणि म्हणाले दोन बायपॅप आले , आधी तातडीने ते मला द्या! येथे बायपॅप नसल्याने दोन रुग्णांना मी आता डीस्चार्ज देऊन अन्यत्र जाण्यास सांगणार होतो. आणि काही मिनिटातच ते दोन बायपॅप प्रत्यक्ष रुग्णांच्या सेवेत रुजू झाले.

"देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे " असे एक छान सुभाषित आहे. याचा प्रत्ययच जणू आज प्रत्यक्षात आला. हे जवळपास दोन लाखाचे सामान देणारी नाव जाहिर न करणारी व्यक्तीने दिलेली वस्तूरुप देणगी अगदी क्षणाचा विलंब नहोता दोन व्यक्तींच्या श्वासाचा जीवनाधार ठरते. हे जीवनाचे नातेच किती अदभूत, विलक्षण, कल्पनातीत. तरीही आम्ही पुन्हा पुन्हा विचारले आपण तर असे दुरच्या शहरातील आपले मातृमंदिर प्रकल्पाला देणगी देण्यामागची प्रेरणा कोणती , आम्ही काय सांगू ? कोणाकडून आली ही मौल्यवान देणगी? तर त्या दानशूर व्यक्तीचे एकच बोल होते. "देवरुखच्याच एकाने दिली असंच सांगा." ही सारी मावशींच्या प्रेम , वात्सल्य आणि कारुण्याची पुण्याई. आज प्रत्येक क्षण कॅमेरात चित्रबध्द करतांना आणि प्रसिध्दिची संधी न सोडणाऱ्या दिवसात अशी निरामय दानशूरता एक आगळाच अनुभव देऊन गेली,. सामाजिक आणि शैक्षणिक संस्थात्मक क्षेत्रात फार मोठे कार्य करणाऱ्या या महोदयांच्या या दानशूरतेला मातृमंदिरचा मनापासून सलाम!

# MATRUMANDIR DCHC










जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मानित

# मातृमंदिर देवरुख

स्थापना १९५४

## मातृमंदिर कोविड केअर सेंटर – मदतीचे आवाहन

**देवरुख परिसरातील ५० पेक्षा अधिक गावांना कोविड आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकिय साधनांची गरज आहे**

* बेड/आयसीयू बेड – २०
* मॉनिटर – ६
* ऑक्सीजन कॉन्सेंट्रेटर
* औषधे
* बायपॅप मशीनस्
* रुग्ण भोजन व्यवस्था/सामग्री
* ऑक्सीमीटर

**आपण आर्थिक स्वरूपातील मदतीसह वस्तूंची मदत संस्थेला करावी. आपली मदत मोलाची ठरणार आहे. आर्थिक मदतीला ८०जी अंतर्गत आयकरात सुट मिळेल.**

## रुग्णांना मोफत जेवण आणि आरोग्य सुविधा

आपली आर्थिक मदत आमच्यापर्यंत पोहचण्यासाठी
बँक डिटेल्स्

**अपना सहकारी बँक लि.**

शाखा – देवरुख
बचत खाते क्र. – 029011100004197
IFSC - ASBL0000029



संपर्क
अभिजित हेगशेटये (कार्याध्यक्ष)
आत्माराम मेस्त्री (कार्यवाह)
मातृमंदिर, देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी
www.matrumandirdevrukh.org
Phone : 94220 52314 / 94224 30809